न्यूज एक्सप्रेस मराठी
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल
बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२
www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शुक्रवार, दि. 20 सप्टेंबर 2024 | पान- 1

# माझ्या पक्षांतराच्या बातम्या खोट्या : आमदार अश्विनी जगताप

**वेगळा मार्ग निवडण्याच्या मनस्थितीत असल्याची चर्चा शहरात सुरु आहे : या चर्चेवर आता स्वतः अश्विनी जगताप यांनी स्पष्टीकरण दिलं आहे.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड मतदारसंघाच्या भाजपच्या विद्यमान आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप भाजपला रामराम करत तुतारी हाती घेणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे. लक्ष्मण जगताप यांचे बंधू शंकर जगताप हे देखील विधानसभा निवडणूक लढण्यासाठी इच्छुक आहेत. एकाच घरातून दोघांना तिकिट मिळणे अशक्य आहे. त्यामुळे अश्विनी जगताप राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश करून वेगळा मार्ग निवडण्याच्या मनस्थितीत असल्याची चर्चा शहरात सुरु आहे. या चर्चेवर आता स्वतः अश्विनी जगताप यांनी स्पष्टीकरण



दिलं आहे.

अश्विनी जगताप म्हणाल्या, "माझ्या पक्षांतराच्या बातम्या खोट्या आहेत. कोणीतरी हे वावटळ उठवलं आहे आणि त्याला विरोधक खतपाणी घालत आहेत. माझे पती गेल्यानंतर पक्षाने माझ्यावर विश्वास ठेवून मला पोटनिवडणुकीत उमेदवारी दिली आणि निवडून आणलं. या माध्यमातून त्यांनी माझ्या पतीला श्रद्धांजली वाहिली. ते आणि देवेंद्रजी खूप चांगले मित्र होते. देवेंद्रजी या भागात आल्यानंतर नेहमी आमच्या घरी यायचे. त्यामुळे पक्ष सोडून जाणं हे माझ्या डोक्यात अजिबात नाही", असं स्पष्टीकरण आमदार जगताप यांनी दिलं आहे.

# वाचाळवीरांना जनताच धडा शिकवणार : डॉ. कैलास कदम

**अनिल बोंडे यांच्या विरोधात शहराध्यक्ष डॉ.कैलास कदम यांच्या नेतृत्वात निषेध सभा घेण्यात आली**

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने चिंचवड स्टेशन येथील लहुजी वस्ताद साळवे यांच्या पुतळ्यासमोर लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांच्या विरोधात बेताल वक्तव्य करणाऱ्या शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड व भारतीय जनता पक्षाचे नेते अनिल बोंडे यांच्या विरोधात शहराध्यक्ष डॉ.कैलास कदम यांच्या नेतृत्वात आज निषेध सभा घेण्यात आली.



यावेळी निषेध व्यक्त करताना शहराध्यक्ष डॉ.कैलास कदम यांनी गृहमंत्री देवेंद्र फडवणीस, संजय गायकवाड व अनिल बोंडे यांच्या विरोधात घोषणा देऊन निषेध व्यक्त केला. व देशाचे नेतृत्व असलेले काँग्रेस पक्षाचे प्रत्येक कार्यकर्त्यांचा श्रद्धास्थान असलेले आदर्श नेतृत्व राहुल गांधी हे जनसामान्य मध्ये जाऊन ज्या प्रकारे काम करत आहेत त्यांना सर्व स्तरावरून जो पाठिंबा मिळत आहे, त्यामुळेच वैफल्यग्रस्तातून विरोधक जाणून-बुजून राज्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडावी व विधानसभा निवडणुकीत त्याचा फायदा व्हावा यासाठी अशी बेताल वक्तव्य करीत आहेत. ज्या गांधी घराण्याने देशासाठी आपले सर्वस्व त्याग केले त्यांच्याबद्दल असे बोलणे हे मनोरुग्ण असल्याचे लक्षण आहे आणि अशा वाचाळवीरांना जनताच येणाऱ्या निवडणुकीत धडा शिकवेल, पुन्हा अशा प्रकारचे वक्तव्य केल्यास काँग्रेसचा प्रत्येक कार्यकर्ता हा रस्त्यावर उतरून जशास तसे उत्तर या नेत्यांना देईल असे बोलून निषेध व्यक्त केला.

याप्रसंगी श्रीमती श्यामला सोनवणे, भाऊसाहेब मुगुटमल, संदेश नवले, लक्ष्मण रुपनर, किशोर कळसकर, अमर नाणेकर, चंद्रकांत लोंढे, मयुर जयस्वाल, ॲड. अनिरुद्ध कांबळे, माऊली मलशेट्टी, विश्वनाथ जगताप, विठ्ठल शिंदे, सोमनाथ शेळके, हिरामण खवळे, जार्ज मॅथ्यू, गौरव चौधरी, वाहब शेख, रशिद अत्तार, मुन्साफ खान, बाबासाहेब बनसोडे, डॉ. मनिषा गरूड, अर्चना राऊत, निर्मला खैरे, अरूणा वानखेडे, भारती घाग, सुनिता जाधव, सुवर्णा कदम, महानंदा कसबे, अबूबकर लांडगे, गणेश गरड, सतिश भोसले, वसंत वावरे, चंद्रशेखर जाधव, राहुल शिंपले, मकरध्वज यादव, जिफिन जॉनसन, विशाल कसबे, राजन नायर, सुनिल राऊत, जमील औटी, सतिश नायर, सुरज कोथिंबीरे, संदीप शिंदे, अमरजीतसिंह पोथीवाल, मेहबूब मलिक, संगम गंगापुरे, भिमराव जाधव, कैलास मकासरे, साजिद खान व शहर काँग्रेसचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राम वाकडकर यांचा राजीनामा आणि आरोप म्हणजे भाजपच्या बदनामीचे सुनियोजित कटकारस्थान : राजू दुर्गे

**भाजपवर तसेच जगताप कुटुंबावर बिनबुडाचे आरोप करीत स्वतःची निष्क्रियता झाकण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येत आहे.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहर भाजपचे उपाध्यक्ष राम वाकडकर यांच्या पक्ष सदस्यत्व राजीनाम्याचे सोशल मीडियावर समजले. राजीनामा देताना त्यांनी भाजपवर तसेच जगताप कुटुंबावर बिनबुडाचे आरोप करीत स्वतःची निष्क्रियता झाकण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येत आहे. त्यांचा राजीनामा व आरोप म्हणजे विधानसभा निवडणुकीपूर्वी भाजपच्या बदनामीचे सुनियोजित कटकारस्थान असल्याचा आरोप भाजपचे वरिष्ठ उपाध्यक्ष व पक्ष प्रवक्ते राजू दुर्गे यांनी केला आहे.



याबाबत राजू दुर्गे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, भाजप पक्षात प्रवेश करताच राम वाकडकर यांना २०१७ ची महापालिका निवडणुक लढविण्याची संधी पक्षाने दिली. त्यावेळी त्यांच्यासह भाजपच्या संपूर्ण पॅनलचा पराभव होऊनही दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी वाकडकर यांना पक्षाच्या शहर उपाध्यक्षपदी संधी दिली. मात्र तरीही वाकडकर हे पक्षाच्या कोणत्याही बैठकीस किंवा कार्यक्रमास उपस्थित राहिले नाहीत की त्यांनी प्रदेशाकडून आलेला पक्षाचा कोणताही कार्यक्रम त्यांच्या वाकड प्रभागात राबविला नाही. त्यांच्या प्रभागातील बूथ प्रमुख व शक्तिकेंद्र प्रमुख ही रचनाही कधी पूर्ण केली नाही. असे असतानाही पक्षाने त्यांना कधीच डावलले नाही. मग त्यांच्यासोबत गटबाजी झाली अथवा अन्याय झाला असे कसे म्हणता येईल?

वाकडकर यांनी पक्षावर घराणेशाहीचा आरोप केला. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी अश्विनी जगताप यांना पोटनिवडणुकीत उमेदवारी देण्याचा निर्णय पक्षश्रेष्ठींनी घेतला. त्यामुळे येथे घराणेशाहीचा प्रश्न उद्भवत नाही. याउलट पोटनिवडणुकीत आपण पक्षाचे काम केल्याचा कांगावा करणाऱ्या वाकडकर यांच्याच प्रभागातून अश्विनी जगताप या पिछाडीवर होत्या. त्यामुळे त्यांनी पक्षाचे काम केल्याचा दावाही खोटा आहे. ज्या जगताप कुटुंबाने वेळोवेळी वाकडकर यांच्यावर विश्वास ठेवून त्यांना अनेकदा पक्षाच्या महत्त्वपूर्ण जबाबदारी देऊन काम करण्याची संधी दिली. त्याच जगताप कुटुंबावर केलेला मनमानी कारभाराचा आरोप हा तर निव्वळ थोतांड असल्याचे दुर्गे यांनी म्हटले आहे.

# पुणे मेट्रोचा नवा विक्रम, एकाच दिवसात साडेतीन लाख प्रवाशांची मेट्रो सफर

## सातत्याने वाहतूक कोंडीतून प्रवास करणाऱ्या पुणेकरांना नवीन पर्याय मिळाला, पुण्यात मेट्रो सेवा लोकप्रिय होऊ लागली.

**पुणे | प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी 27 सप्टेंबर रोजी पुणे दौऱ्यावर आहेत. त्यावेळी पुण्यातील सर्वाधिक चर्चेतील शिवाजीनगर-स्वारगेट मेट्रो मार्गाचे उद्घघाटन होणार असल्याचे सांगितले जात आहे. पुणे मेट्रोचा हा मार्ग भुयारी मार्ग आहे. तसेच पुणे मेट्रोच्या स्वारगेट ते कात्रज या मार्गाला नुकतीच केंद्र सरकारने मान्यता दिली होती.

पुणे शहरात सार्वजनीक वाहतूक व्यवस्था वर्षभरापूर्वी फक्त पीएमपीएमएलवर अवलंबून होती. मागील वर्षी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुण्यातील दोन मार्गावर मेट्रो सुरु केली. त्यानंतर सातत्याने वाहतूक कोंडीतून प्रवास करणाऱ्या पुणेकरांना नवीन पर्याय मिळाला. पुण्यात मेट्रो सेवा लोकप्रिय होऊ लागली. पुणेकर आपल्या वाहनांऐवजी मेट्रोने प्रवास करण्यास प्राधान्य देऊ लागले. मेट्रोने शनिवारी, रविवारी सवलत, विद्यार्थ्यांसाठी सवलतीचा प्रवास सुरु केला. आता पुणे शहरातील मेट्रोने गणेश विसर्जनाच्या दिवशी नवीन विक्रम रचला आहे. पुणे मेट्रोतून एकाच दिवसात साडेतीन लाख प्रवाशांची प्रवास केला आहे. मेट्रोच्या इतिहासातील हा आतापर्यंतचा उच्चांक आहे.



### एकाच दिवसांत पुणे मेट्रोला 54 लाखांचे उत्पन्न

» पुणे शहरात अनंत चतुदर्शीला लाडक्या गणरायाला निरोप देण्यात आला. त्यावेळी लाखो पुणेकर गणरायाचे दर्शन घेण्यासाठी आले होते. अनेकांनी बसने प्रवास केला. परंतु लाखो लोकांनी मेट्रोने प्रवास केला. यामुळे गणेश विसर्जनाच्या दिवशी मेट्रोने नवीन विक्रम रचला. मंगळवारी एकाच दिवसात साडेतीन लाख प्रवाशांनी मेट्रोने प्रवास केला. लाखो पुणेकरांनी विसर्जन मिरवणूक अनुभवण्यासाठी मेट्रोचा आधार घेतला. एकाच दिवसात तीन लाख 46 हजार 633 प्रवाशांनी प्रवास केला. त्यामुळे अनंत चतुर्दशीच्या दिवशी पुणे मेट्रोला 54 लाख 92 हजार 412 रुपयांचे उत्पन्न मिळाले.

वनाज ते रामवाडी आणि पिंपरी ते सिव्हिल कोर्ट या मार्गावर मेट्रो सेवा सुरू आहे. शनिवारी (दि. १४) सकाळी ६ ते रात्री ८ वाजेपर्यंत तब्बल २ लाख ७८ हजारांहून अधिक प्रवाशांनी मेट्रोतून प्रवास केला. मेट्रोची सेवा रात्री १२ वाजेपर्यंत सुरू होती. वनाज ते शिवाजीनगर न्यायालय या मार्गावर प्रवाशांची वाहतूक सुमारे ६० टक्के होती तर पिंपरी ते शिवाजीनगर न्यायालय, रामवाडी ते शिवाजीनगर न्यायालय दरम्यानच्या मार्गावरही प्रवाशांची गर्दी होती. शहराच्या मध्यभागात येण्यासाठी प्रवासी शिवाजीनगर न्यायालय, डेक्कन जिमखाना, संभाजी उद्यान या मेट्रो स्थानकांवर शनिवारी दुपारपासूनच गर्दी पाहायला मिळाली. मेट्रो प्रशासनाने गर्दी पाहता अतिरिक्त सेवा पुरवण्याची तयारी केली होती, त्यामुळे प्रवाशांना सणासुदीच्या काळात कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागला नाही.

पुणे मेट्रोच्या स्वारगेट ते कात्रज या मार्गाला नुकतीच केंद्र सरकारने मान्यता दिली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एसपी कॉलेजच्या मैदानावर त्यांची सभाही होणार आहे. पुणे मेट्रोच्या स्वारगेट ते शिवाजीनगर मार्गाचे काम पूर्ण झाले आहे. त्यावर चाचणीही घेण्यात आली आहे.

### दहा दिवसांत सात लाख प्रवाशांचा प्रवास

» पुणे मेट्रोतून गणेश उत्सवातील दहा दिवसांत 6 लाख 93 हजार 580 प्रवाशांनी प्रवास केला. त्यामुळे पुणे मेट्रोला 3 कोटी 5 लाख 81 हजार 59 रुपयांचा महसूल मिळाला. 7 ते 17 सप्टेंबरपर्यंत पुणे मेट्रोने मध्यरात्रीपर्यंत सेवा दिली होती. तसेच 17 आणि 18 सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशीला 24 तास सेवा दिली होती.

### मोदी यांच्या दौऱ्यात आणखी नवीन मार्ग

» पंतप्रधान नरेंद्र मोदी 27 सप्टेंबर रोजी पुणे दौऱ्यावर आहेत. त्यावेळी पुण्यातील सर्वाधिक चर्चेतील शिवाजीनगर-स्वारगेट मेट्रो मार्गाचे उद्घघाटन होणार असल्याचे सांगितले जात आहे. पुणे मेट्रोचा हा मार्ग भुयारी मार्ग आहे. तसेच पुणे मेट्रोच्या स्वारगेट ते कात्रज या मार्गाला नुकतीच केंद्र सरकारने मान्यता दिली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एसपी कॉलेजच्या मैदानावर त्यांची सभाही होणार आहे. पुणे मेट्रोच्या स्वारगेट ते शिवाजीनगर मार्गाचे काम पूर्ण झाले आहे. त्यावर चाचणीही घेण्यात आली आहे.

# ‘सीबीएसई पॅटर्न’बाबत शिक्षण विभागातच संभ्रमाची स्थिती

## अभ्यासक्रम आराखडा अद्याप अंतिम झालेला नसताना सीबीएसई पॅटर्ननुसार अभ्यासक्रम राबवणे शैक्षणिकदृष्ट्या अयोग्य असल्याचे मत शिक्षणतज्ज्ञांनी व्यक्त

**पुणे | प्रतिनिधी**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०नुसार राज्याच्या शिक्षण विभागाचा तिसरी ते बारावीचा अभ्यासक्रम आराखडा अद्याप अंतिम झालेला नसताना सीबीएसई पॅटर्ननुसार अभ्यासक्रम राबवणे शैक्षणिकदृष्ट्या अयोग्य असल्याचे मत शिक्षणतज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. दुसरीकडे सीबीएसईच्या धर्तीवर अभ्यासक्रम करणार म्हणजे नेमके काय होणार, याबाबत शिक्षण विभागातच अजून पुरेशी स्पष्टता आलेली नाही.

राज्य शिक्षण मंडळाच्या शाळांमध्ये पुढील शैक्षणिक वर्षापासून सीबीएसईच्या धर्तीवर अभ्यासक्रम राबवण्याची, त्यासाठीच्या पुस्तकांची आखणी करण्यास सुरुवात केल्याची घोषणा शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी नुकतीच केली. त्या पार्श्वभूमीवर शिक्षण क्षेत्रातून विविध मते व्यक्त होत आहेत.



### सीबीएसईच्या अभ्यासक्रमामुळे काठिण्यपातळी वाढेल

» ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. अ. ल. देशमुख म्हणाले, की राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात अभ्यासक्रम, मूल्यमापन पद्धतीमध्ये समानता आणण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. गेली काही वर्षे राज्यात ७० टक्के सीबीएसई, ३० टक्के राज्याचा अभ्यासक्रम अशी रचना आहे. सीबीएसईच्या शाळांना गर्दी होऊन मराठी माध्यमाच्या शाळा ओस पडत आहेत. राज्यात सीबीएसईचा अभ्यासक्रम लागू करणे स्वागतार्ह ठरू शकते. त्यामुळे मराठी, सेमी इंग्रजी माध्यमाच्या शाळांची प्रवेशसंख्या वाढू शकते. सीबीएसईच्या अभ्यासक्रमामुळे काठिण्यपातळी वाढेल. त्यासाठी शिक्षकांना सक्षम करण्यासाठी प्रशिक्षण, पदव्युत्तर पदवीप्राप्त नवे शिक्षक नियुक्त करणे आवश्यक ठरेल.

नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार, शालेय अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यात येणार आहे. त्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) तिसरी ते बारावीसाठी अभ्यासक्रम आराखडा तयार करून जाहीर केला. या आराखड्यावर शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ, अभ्यासक अशा विविध घटकांकडून सुमारे ३ हजार ९०० हरकती-सूचना दाखल झाल्या आहेत. त्यानंतर अंतिम केलेला अभ्यासक्रम आराखडा अद्याप जाहीर करण्यात आलेला नाही. त्यापूर्वीच शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी राज्यात सीबीएसई पॅटर्ननुसार अभ्यासक्रम राबवण्याचे जाहीर केले आहे. त्यासाठी शिक्षक संघटनांशी चर्चा करू, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

राज्यात राज्य शैक्षणिक संशोधन परिषद अर्थात एससीईआरटीने अभ्यासक्रम निश्चित करून पाठ्यक्रम तयार केल्यावर बालभारतीकडून पुस्तके तयार केली जातात. मात्र, अद्याप अभ्यासक्रम आराखडाच निश्चित झालेला नाही. त्यामुळे राज्यातील शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्ननुसार अभ्यासक्रम राबवणार म्हणजे काय होणार, याबाबत शिक्षण विभागातील काही अधिकाऱ्यांकडे चौकशी केली असता, त्याबाबत स्पष्टता नसल्याचे त्यांनी सांगितले.

# महापालिकेतर्फे स्वच्छता सांस्कृतिक उत्सव

## 'स्वच्छता ही सेवा' पंधरवडानिमित्त पर्यावरण जगजागृतीवर देणार भर : अभिनेत्री मृण्मयी देशपांडे यांची उत्सवाला विशेष उपस्थिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

२ ऑक्टोबर महात्मा गांधीजी यांच्या जयंतीनिमित्त आदरांजली अर्पण करण्यासाठी १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२४ या दरम्यान महापालिकेच्या वतीने 'स्वच्छता ही सेवा' पंधरवडा अंतर्गत 'स्वभाव स्वच्छता-संस्कार स्वच्छता' हे अभियान राबवण्यात येत आहे. स्वच्छता ही सेवा २०२४ अंतर्गत शुक्रवारी (२० सप्टेंबर) रोजी सकाळी ७ ते १० या वेळेत सी सर्कल, स्पाईन रोड, भोसरी येथे 'स्वच्छ सांस्कृतिक उत्सव' आयोजित करण्यात आला आहे. या उत्सवाचे उद्घाटन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते होणार असून या कार्यक्रमास मराठी सिने अभिनेत्री मृण्मयी देशपांडे यांची विशेष उपस्थिती असणार आहे. या उत्सवास प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, सहकार आणि नागरी विमान वाहतूक विभागाचे केंद्रिय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ उपस्थित राहणार आहे. यासोबतच विशेष अतिथी म्हणून सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची उपस्थिती असणार आहे.




तसेच खासदार मेधा कुलकर्णी, सुनेत्रा पवार, वंदना चव्हाण, सुप्रिया सुळे, श्रीरंग बारणे, डॉ. अमोल कोल्हे, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, संग्राम थोपटे, अण्णा बनसोडे, महेश लांडगे, अश्विनी जगताप, यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. यांसह शहरातील पर्यावरणप्रेमी, ज्येष्ठ नागरिक, सामाजिक कार्यकर्ते यांची उपस्थिती राहणार आहे. तरी आपले शहर आणि आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने स्वच्छता ही सेवा पंधरवडा अंतर्गत राबवण्यात येणाऱ्या स्वभाव स्वच्छता-संस्कार स्वच्छता या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

तरी आपले शहर आणि आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने स्वच्छता ही सेवा पंधरवडा अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या स्वभाव स्वच्छता – संस्कार स्वच्छता या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी केले आहे. महापालिकेच्या वतीने("स्वच्छता ही सेवा पंधरवडा" निमित्त आयोजित स्वच्छ सांस्कृतिक उत्सवात मराठी सिने अभिनेत्री मृण्मयी देशपांडे यांची विशेष उपस्थिती राहणार असल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली आहे.

### 'स्वच्छता ही सेवा' पंधरवडा

» महापालिकेच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या 'स्वच्छता ही सेवा' पंधरवडा निमित्त स्वच्छ सांस्कृतिक उत्सव आयोजित करण्यात येणार असून ख्यातनाम सिने अभिनेत्री मृण्मयी देशपांडे यांची या उत्सवाला विशेष उपस्थिती राहणार असल्याची माहिती आरोग्य विभागाचे सहाय्यक आयुक्त अजिंक्य येळे यांनी दिली आहे.

# 'स्वराज्य'मध्ये नागरिकांना मिळवून दिले हक्काचे पाणी!

## अजित गव्हाणेंकडून वसंत बोराटेंच्या कामाचे तोंड भरून कौतुक

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी, बोराटेवस्ती येथील स्वराज्य हाऊसिंग सोसायटीमध्ये गेल्या अनेक महिन्यांपासून पाण्याचा प्रश्न गंभीर झाला होता. तब्बल 605 सदनिकाधारक या पाणीटंचाईने वैतागले होते. या प्रश्नाला मार्गी लावण्याचा "विडा" माजी नगरसेवक वसंत बोराटे यांनी उचलला होता. प्रशासकीय संघर्ष पार पाडत अखेर स्वराज्य सोसायटीमध्ये नागरिकांच्या हक्काचे पाणी अक्षरशः खेचून आणले. त्यांच्या या प्रयत्नांचे तोंड भरून कौतुक माजी स्थायी समिती अध्यक्ष अजित गव्हाणे यांनी केले. तर अजित गव्हाणे यांच्या पुढाकारातून प्रश्न मार्गी लागल्याची भावना बोराटे यांनी व्यक्त केली.

अजित गव्हाणे यावेळी म्हणाले, स्वराज्य सोसायटीमध्ये 605 सदनिकाधारक आहेत. या सोसायटीला गेल्या अनेक महिन्यांपासून वेळेवर तसेच नियमित पाणीपुरवठा होत नव्हता. रोजच्याच पाणी टंचाईमुळे येथील नागरिक वैतागलेले होते. सोसायटीतील पदाधिकारी, मुख्य म्हणजे माजी नगरसेवक वसंत बोराटे यांनी माझ्याशी या समस्येबाबत चर्चा केली. प्रशासकीय पातळीवर हा प्रश्न कसा हाताळता येईल? काय उपाययोजना केल्या पाहिजेत?



जेणेकरून नागरिकांना त्यांच्या हक्काचे पाणी मिळेल. अशी चर्चा वसंत बोराटे यांच्याशी करण्यात आली. या चर्चेतून मार्ग निघाला. अखेर स्वराज्य हाउसिंग सोसायटीमधील रहिवाशांना त्यांच्या हक्काचे पाणी वसंत बोराटे यांच्या प्रयत्नाने मिळाले. वसंत बोराटे यांच्या कामाची पद्धत म्हणजे 'तात्काळ ॲक्शन' अशी आहे. त्यांना या भागातील रहिवासी कोणत्याही मूलभूत सुविधेपासून वंचित राहिले नाही पाहिजे अशी आहे. ही सोसायटीच नाही तर या भागात त्यांचे काम खूप चांगले आहे. वसंत बोराटे कधीच एखादी गोष्ट सांगत नसतात तर त्यांना ते काम करायचेच असते. योग्य ठिकाणी योग्य ते काम करण्याची त्यांची खासियत आहे.

### गव्हाणे यांच्या पुढाकारातून प्रश्न मार्गी : बोराटे

» वसंत बोराटे यावेळी म्हणाले स्वराज्य हाउसिंग सोसायटीतील पाण्याचा प्रश्न गंभीर झाला होता. कोणत्याही परिस्थितीत हा प्रश्न सोडवून मला नागरिकांना दिलासा द्यायचा होता. यासाठी वेळोवेळी गव्हाणे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनातून या समस्येवर मार्ग निघाला. आज येथील 605 रहिवाशांना त्यांच्या हक्काचे पाणी मिळवून दिले आहे. तसेच या ठिकाणी असलेल्या मंदिराला सभामंडप बांधण्याचे काम देखील आता सुरू होणार आहे. यामध्ये अजित गव्हाणे यांनी दाखवलेला सकारात्मक विश्वास, त्यांचे मार्गदर्शन आणि त्यांच्या प्रशासकीय कामावरील हातोटीचा अनुभव आम्ही सर्वांनीच घेतला आहे. त्यामुळे या भागातील रहिवाशांना यापुढे असाच "मार्गदर्शक" आणि दुसऱ्याच्या कामाचेही कौतुक करणारा नेता हवा आहे.

# भोसरी मतदार संघातील वीजविषयक कामांना "बुस्टर"

## 3 कोटी 22 लाखांच्या कामांना मंजुरी; भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरी विधानसभा मतदार संघातील वीज विषयक विविध कामांसाठी पुणे जिल्हा नियोजन समितीकडून सुमारे ३ कोटी २२ लाख रुपयांच्या विविध कामांना व उपकरणे खरेदीला मंजुरी मिळाली आहे. भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले आहे. भोसरीसह समाविष्ट गावांमध्ये वीज पुरवठा यंत्रणा सक्षम करण्यासाठी आमदार लांडगे यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. भोसरी शाखेचे विभाजन, नवीन उच्चदाब केंद्र, नवीन रोहित्र उभारणी अशा कामांना यापूर्वीच राज्य सरकारने मंजुरी दिली असून, त्यादृष्टीने मनुष्यबळ निर्मितीही करण्यात येत आहे.

दरम्यान, जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून चिखली आणि परिसरात ३१५ KVA चा रोहित्र ६३० KVA करून क्षमता वाढविणे, विद्युत वाहिनी भूमिगत करणे, विद्युत वाहिनीस पर्यायी केबल टाकणे, नवीन फीडरपिलर बसवणे, जुन्या निष्क्रिय झालेल्या वीजवाहिनी बदलणे अशी कामे करण्यात येणार आहेत. तसेच दिघी व परिसरात येथे विद्युत वाहिनी भूमिगत करणे, चऱ्होली परिसरात विद्युत वाहिनी भूमिगत करणे, जुन्या निष्क्रिय झालेल्या विद्युत वाहिनी बदलणे, जाधववाडी येथे रोहित्र स्थलांतरित करणे, मोशी येथे ६३० KVA चा नविन रोहित्र उभारणी करणे, इंद्रायणीनगर, भोसरी येथे नवीन फीडरपिलर बसवणे, नवीन फीडरपिलर बसवणे, कृष्णानगर परिसरात जुन्या निष्क्रिय झालेल्या विद्युत वाहिनी बदलणे, गणेशनगर तळवडे येथे नवीन वीजवाहिनी टाकणे आदी कामे करण्यात येणार आहेत.




भोसरी विधानसभा मतदार संघातील वीज विषयक समस्या मार्गी लावण्याबाबत आम्ही सातत्त्याने पाठपुरावा करीत आहोत. राज्याच्या विधिमंडळ सभागृहात याबाबत सरकारचे लक्ष वेधले. त्यामुळे भोसरी शाखेचे विभाजन, नवीन उच्चदाब केंद्र निर्मितीचा निर्णय झाला. महावितरण इन्फ्र- २ मधील कामांसाठीही आम्ही आग्रही आहोत. वीजग्राहक, उद्योजक यांना भेडसावणारी समस्या निकालात काढण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून विविध कामे मार्गी लागत आहेत, याचे समाधान आहे. प्रशासनाने सदर कामे लवकरात लवकर पूर्ण करावीत, अशी सूचना केली आहे.

**- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

# तब्बल 30 तासांनी संपली गणेश विसर्जन मिरवणूक

## पुणेकरांच्या अजोड उत्साहात, आनंदात वैभवशाली गणेश विसर्जन मिरवणूक पार पडली.

**पुणे | प्रतिनिधी**

वैभवशाली परंपरा असलेल्या गणपती विसर्जन मिरवणुकीला गुरुवारी सकाळी १० वाजून १५ मिनिटांनी सुरुवात झाली ती मानाचा पहिला असलेला कसबा गणपतीच्या पारंपरिक पालखीमधील मिरवणुकीने. कसबा गणपतीचे विसर्जन मंगळवारी ४ वाजून ३५ मिनिटांनी झाले. दुसरा मानाचा गणपती तांबडी जोगेश्वरीचे विसर्जन ५ वाजून १० मिनिटांनी झाले. तिसरा मानाचा गणपती गुरुजी तालीमच्या बाप्पाचे ५ वाजून ४४ मिनिटांनी विसर्जन झाले. मानाचा चौथा गणपती तुळशीबाग मंडळाच्या बाप्पाचे विसर्जन ७ वाजून १५ मिनिटांनी झाले. मानाच्या पाचव्या केसरीवाडा गणपतीचे विसर्जन ७ वाजून ३८ मिनिटांनी झाले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही वेळेत मानाच्या पाच गणपतींचे विसर्जन झाले. कसबा गणपतीची मिरवणूक लक्ष्मी रस्त्यावरील मुख्य मिरवणूक मार्गाने सकाळी दहा वाजता निघाली. दुपारी ४.३५ वाजता गणेश मूर्तीचे विसर्जन करण्यात आले. यंदा मंडळाच्या मिरवणुकीत प्रभात बँडपथक, कामायनी प्रशाला आणि बँक ऑफ इंडियाचे पथक होते. मानाच्या गणपतीचे विसर्जन झाल्यानंतर हिंदुस्थानातील पहिला सार्वजनि क गणपती असलेल्या श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्टच्या बाप्पाच्या मिरवणुकीला सुरुवात झाली. बेलबाग चौकातून भाऊसाहेब रंगारी गणपती बुधवारी पहाटे ४ वाजून २३ मिनिटांनी निघाला. त्यानंतर सकाळी ८.०६ वाजता मिरवणूक संपली. त्यापाठोपाठ अखिल मंडई मंडळासह हुतात्मा बाबू गेनू गणपती मंडळ, श्री जिलब्या मारुती गणपती मंडळ ट्रस्ट ही पुण्यातील प्रमुख गणपती मंडळे नियोजित वेळेत मिरवणुकीत सहभागी झाली होती.

मानाची मंडळे मार्गस्थ झाल्यानंतर सायंकाळनंतर ध्वनिवर्धकांचा दणदणाट सुरू झाला. सदाशिव पेठ, नारायण पेठ, शनिवार पेठ, शुक्रवार पेठेतील छोटे रस्ते बांबुचे अडथळे उभे करून वाहतुकीसाठी बंद केले होते. शहराच्या चार मुख्य मिरवणुकीत एकूण ४५२ गणेश मंडळे सहभागी झाली होती. तसेच खडकी, लष्कर, येरवडा, कर्वेरस्ता, दत्तवाडी व शहराच्या इतर भागात विसर्जन मिरवणुका पार पडल्या. त्यामध्ये ३ हजार ७६३ सार्वजनिक आणि १० लाख १४ हजार ६३७ घरगुती गणेश मूर्तीचे विसर्जन केले.



### आजीबाई थिरकल्या

» सकाळी सहा वाजता डिजे वाजवण्यास पोलिसांनी मज्जाव केल्याच्या नाट्यानंतर टिळक रस्त्यावर मिरवणूक दणक्यात सुरु झाली. रात्रभरानंतर सकाळीही तेवढाच उत्साह तरुणांमध्ये दिसून येत होत. त्यात एक आजीबाईंनी गाण्याच्या ठेक्यावर चांगलाच ताल धरला होता. आजीबाई थिरकत असल्याचे मंडळाच्या कार्यकर्त्यांनी पाहिले अन् थेट त्यांना ट्रॅक्टरवर चढून नाचण्याची विनंती केली. पोरांच्या हट्टाला आजीबाईने होकार देत थेट ट्रॅक्टरवर एन्ट्री घेत 'तुम तो धोकेबाज हो, वादा कर के भूल जाते हो' गाण्यावर ठेका धरला. त्यांच्या नृत्याचा व्हीडीओ दिवसभर सोशल माध्यमावर धुमाकुळ घालत होता.

### दगडूशेठ गणपतीने यंदाही पाळली वेळ

» श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंडळाच्या बाप्पाची विसर्जन मिरवणूक दुपारी ४.३५ वाजता बेलबाग चौकातून पुढे निघाली. नियोजित वेळेनुसार दुपारी चार वाजता दगडूशेठ गणपतीच्या मिरवणुकीला सुरुवात झाल्यामुळे भाविकांचा उत्साह चांगलाच वाढला होता.टिळक चौकात दगडूशेठ गणपतीचे आगमन होणार असे जाहीर करताच भक्तांनी एकच श्वास रोखून धरला होता. जसे गणाधीश रथाचे दर्शन होताच भक्तांनी जल्लोष केला. गणपती बाप्पा मोरया.. मंगलमुर्ती मोरया..या जय घोषाने टिळक चौक चौक दणाणून गेला. ८ वाजून ५६ वाजता गणपतीचे पांचाळेश्वर मंदिर घाटावर विसर्जन करण्यात आले. दगडूशेठ गणपतीने यंदाही वेळ पाळल्याने भक्तांनी पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे कौतुक केले

### मानाच्या गणपतीच्या विसर्जनाची वेळ

- श्री कसबा गणपती दु. ४.३५
- श्री तांबडी जोगेश्वरी मंडळ. सायं. ५.१०
- श्री गुरुजी तालीम मंडळ सायं. ५.४४
- श्री तुळशीबाग गणेशोत्सव मंडळ सायं. ७.१५
- श्री केसरीवाडा मंडळ सायं. ७.३८

# ससूनच्या क्लिनिकल सर्व्हिस लॅबोरेटरीला एनएबीएल प्रमाणपत्र

## पुणे येथिल क्लिनिकल सर्व्हिस लॅबोरेटरीला नॅशनल ॲक्रिडिटेशन बोर्ड फॉर टेस्टिंग ॲन्ड कॅलिब्रेशन लॅबोरेटरीजचे प्रमाणपत्र प्राप्त् झाले आहे

**पुणे | प्रतिनिधी**

बी.जे.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथिल क्लिनिकल सर्व्हिस लॅबोरेटरीला नॅशनल ॲक्रिडिटेशन बोर्ड फॉर टेस्टिंग ॲन्ड कॅलिब्रेशन लॅबोरेटरीजचे (एन.ए.बी.एल) प्रमाणपत्र प्राप्त् झाले आहे. एनएबीएल प्रमाणपत्र प्राप्त प्रयोगशाळा म्हणजे गुणवत्तेत अग्रगण्य प्रयोगशाळा असून यामुळे बी.जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे लॅबच्या गुणवत्तेवर शिक्कामोर्तब झाले आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यांच्यापैकी नॅशनल ॲक्रिडिटेशन बोर्ड फॉर टेस्टिंग ॲन्ड कॅलिब्रेशन लॅबोरेटरीजचे (एन.ए.बी. एल) प्रमाणपत्र प्राप्त करणारी बी.जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथिल क्लिनिकल सर्व्हिस लॅबोरेटरी ही एकमेव संस्था आहे.

क्लिनिकल सर्व्हिस लॅबोरेटरीमध्ये बायोकेमिस्ट्री, पॅथॉलॉजी व मायक्रोबायोलॉजी या विभागांच्या प्रयोगशाळा येतात. प्रयोगशाळेतील तपासण्यात येणाऱ्या चाचण्यांची गुणवत्ता व त्यासाठी राबविली जाणारी यंत्रणा कशी कार्यरत आहे, चाचण्यांचे नमुने घेणे, रिपोर्ट देणे व रिपोर्टची माहिती ठेवणे या सर्व बाबी तपासून एन.ए.बी.एल. ची टीम प्रमाणपत्र प्रदान करते. या मान्यतेमुळे या प्रयोगशाळेमधून दिल्या जाणाऱ्या अहवालांना विशेष महत्व असणार आहे. गुणवत्तेच्या कडक निकषांमुळे रुग्ण निदान व उपचारांसाठी यामुळे साहाय्य होणार आहे. एनएबीएल प्रमाणपत्र मिळविण्यासाठी बायोकेमिस्ट्रीचे प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ. सोमनाथ सलगर, मायक्रोबायोलॉजी विभागाचे प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ. राजेश कार्यकर्ते व पॅथॉलॉजी विभागाचे प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ. लीना नकाते व त्यांच्या टीमने परिश्रम घेतले.




### प्रमाणपत्र प्राप्त केल्याबद्दल अभिनंदन

» एनएबीएल प्रमाणपत्र मिळविण्यासाठी बायोकेमिस्ट्रीचे प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ. सोमनाथ सलगर, मायक्रोबायोलॉजी विभागाचे प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ. राजेश कार्यकर्ते व पॅथॉलॉजी विभागाचे प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ. लीना नकाते व त्यांच्या टीमने परिश्रम घेतले.एनएबीएल प्रमाणपत्र मिळविण्यासाठी बी.जे.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणेचे अधिष्ठाता, डॉ. एकनाथ पवार यांचे ससून क्लिनीकल सर्व्हिस लॅबोरेटरी टीमला वेळावेळी मार्गदर्शन लाभले. प्रमाणपत्र प्राप्त केल्या बद्दल त्यांनी टीमचे अभिनंदनही केले.